# ठाणे वैभव

संस्थापक : नरेन्द्र बल्लाळ
संपादक : मिलिन्द बल्लाळ
इष्ट ते छापणार
ठाणे जिल्ह्याचे लोकहितवादी दैनिक

वर्ष २१ | अंक २७८ | रविवार | ६ जून २००४ | दोन रुपये


# सांस्कृतिक राजधानी डोंबिवली वैद्यकीय राजधानी व्हावी - डॉ. धाकतोडे



डॉ.शरद धाकतोडे



डॉ.वंदना धाकतोडे

(विकास काटदरे यांजकडून)

डोंबिवली, दि.५ - ठाणे जिल्ह्यात डोंबिवलीत प्रथमच संपूर्ण स्टेनलेस स्टिलचे फ्री फायब्रिकेट व प्रिएण्डीनिअर मॉडीलर शस्त्रक्रिया गृह संपूर्णत: निर्जंतुक असणारे आहे. यामुळे ओम हॉस्पीटल व ओॲसिस हेल्थ सेंटर ठाणे जिल्ह्यात अत्याधुनिक तंत्रज्ञान युक्त सेवा व सुविधा देणारे शल्य चिकित्सक व शस्त्रक्रिया गृह असणारे पहिले एकमेव रुग्णालय आहे. डोंबिवली महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हणून प्रसिध्द आहे. तिला वैद्यकीय राजधानी म्हणून लोकमान्यता मिळावी हे आमचे ध्येय आहे, अशी माहिती डॉ.शरद धाकतोडे व डॉ.वंदना धाकतोडे यांनी 'ठाणेवैभव'ला खास मुलाखत देताना दिली.

रविवार ६ जून रोजी अत्याधुनिक रुग्णालयाचे उद्घाटन राज्यपालांचे सेक्रेटरी सुमीत माळीक यांच्याहस्ते शिवाजीराव देशमुख यांच्या उपस्थितीत होणार आहे.

डॉ.शरद धाकतोडे पुढे म्हणाले की, ओम रुग्णालयाला व पॉलिक्लिनिकला वैद्यकीय क्षेत्रात प्रतिष्ठेचा समजल्या जाणारा इंटरनॅशनल सर्टिफिकेशन लिमिटेड या संस्थेने मानांकन केले आहे. ओम हॉस्पिटल डोंबिवलीतील आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रमाणित करण्यात आलेले पहिले रुग्णालय आहे असेही त्यांनी अभिमानाने सांगितले.

४०० चौरस फूट एवढ्या जागेत तळ, पहिला व दुसऱ्या मजल्यावर अत्याधुनिक व सर्वसोयीसुविधांनी युक्त असे शल्य चिकित्सालय तयार करण्यात आले असून त्याचे नाव ओॲसिस या इंग्रजी अक्षरावरून बनविण्यात आल्याचेही डॉ.धाकतोडे यांनी सांगितले. येथे पुरविल्या जाणाऱ्या उच्च दर्जाच्या अद्ययावत व अत्याधुनिक सेवा रुग्णांना माफक दरात पुरविल्या जाणार आहेत असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. वैद्यकीय क्षेत्रातील अत्यंत आधुनिक व मान्यता प्राप्त नवे तंत्र वापरून सेवा देणारे ठाणे जिल्ह्यातील पहिले खऱ्या अर्थाने आरोग्यधाम होईल असा ठाम विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

ओॲसिस रुग्णालयाचे वैशिष्ट्य सांगताना डॉ.धाकतोडे म्हणाले, संपूर्ण स्टेनलेस स्टिलचे फ्री फायब्रिकेट व प्रिएण्डीनिअर शस्त्रक्रिया गृह हे संपूर्णत: निर्जंतुक आहे. लॅमिनार एअरसे असलेले हेपाफिल्टर याचा वापर करण्यात आल्याने संपूर्ण निर्जंतुक असेल व त्यामुळे पर्यावरण राखले जाते असेही ते म्हणाले.

ओॲसिस कार्यरत झाल्यामुळे ३० मिनीट तज्ञ कार्यरत राहतील यामुळे डोंबिवलीकरांना यापुढे डोंबिवली बाहेर उपचार केवळ डोंबिवलीतच नव्हे तर ठाणे, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापूर, भिवंडी इतक्या विस्तृत परिसराला होणार आहे. सर्व विमा कंपन्यांच्या कॅशलेस मेडिक्लेम व थर्ड पार्टी इन्टरन्स योजनांच्या इन्शुरन्स असल्याने त्यांनाही त्याचा लाभ होणार आहे.

डोंबिवली शहर वैद्यकीय गरजांच्या सुविधांसाठी उपचारांकरिता एक अत्याधुनिक स्वयंपूर्ण केंद्र होईल यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू असेही ते नम्रपणे म्हणाले.

डॉ.शरद धाकतोडे स्वत: सर्जन आहेतच तसेच डॉ.सौ.वंदना धाकतोडे पहिल्या महिला सर्जन आहेत.



घोडबंदर मार्गावर अज्ञात वाहनाने दिलेल्या जोरदार धडकेमुळे रिक्षाचा चक्काचूर झाला होता.

# हास्य परिषदेच्या पुरस्काराचे कल्याण येथे आज वितरण